दर रविवारी





# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ७६ वा ❑ भारतीय सौर दिनांक १० वैशाख शके १९४८, गुरूवार दि.३० एप्रिल २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## आजपासून पुण्यात ‘बाल पुस्तक जत्रा २०२६’

### एप्रिलपासून गणेश कला क्रीडा मंच येथे ज्ञान-मनोरंजनाचा मेळावा

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - पुण्यात मुलांसाठी पुणे बाल पुस्तक जत्रा २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. ३० एप्रिल ते ४ मे या कालावधीत स्वारगेट येथील गणेश कला क्रीडा मंच येथे ही जत्रा भरवली जाणार आहे . उन्हाळ्याच्या सुट्टीत मुलांना वाचनाची गोडी लागावी आणि त्यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळावी, हा या जत्रेचा मुख्य उद्देश आहे.

पुणे पुस्तक महोत्सव, पुणे महानगरपालिका, समर्थ युवा फाऊंडेशन आणि संवाद पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने या जत्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ३० एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते जत्रेचे उद्घाटन होईल. यावेळी महापौर मंजुषा नागपुरे, महापालिका आयुक्त नवलकिशोर राम आणि मुख्य संयोजक राजेश पांडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहतील.

या जत्रेत बालसाहित्यावर आधारित १०० हून अधिक पुस्तक दालने असतील. याशिवाय जादूचे प्रयोग, पपेट शो, नाट्यनगरी कार्यशाळा, ग्रामीण व साहसी खेळ आणि विविध खाद्यपदार्थांची चव घेण्यासाठी खाद्यजत्रा हे देखील प्रमुख आकर्षण असणार आहे. जत्रेमध्ये प्रवेश विनामूल्य आहे.

१ मे पासून मुलांसाठी विविध कार्यक्रमांची रेलचेल सुरू होईल. यामध्ये मकरंद टिल्लू यांचा विनोदी कार्यक्रम हसण्याची बायारकी, चैताली माजगावकर यांचा बाहुल्यांचा खेळ आणि मुलांचे



लाडके पात्र चिंटूचे निर्माते चारुहास पंडित यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळेल. २ मे रोजी स-संविधानाचा! हे बालनाट्य सादर केले जाईल, तसेच डॉ. अमेय पांगारकर एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) तंत्रज्ञानाचा अभ्यासात कसा वापर करावा यावर मार्गदर्शन करतील.

३ मे रोजी प्रसिद्ध बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड यांच्यासोबत कथा-कवितांची सफर घडेल, तर सदानंद काले भारतीय वायुसेनेचे पराक्रम आणि विमानांची प्रात्यक्षिके सादर करतील. जत्रेच्या शेवटच्या दिवशी, ४ मे रोजी पालकांसाठी मुलांचा स्क्रीन टाइम कसा कमी करावा यावर श्रुती पानसे आणि स्मिता वळसंगकर संवाद साधतील. सायंकाळी संबळ वादन आणि गोंधळाने या महोत्सवाचा समारोप होईल.

महापौर मंजुषा नागपुरे यांनी ही जत्रा केवळ पुस्तक प्रदर्शन नसून मुलांच्या सर्वांगीण विकासाचा उत्सव असल्याचे म्हटले आहे. मुख्य संयोजक राजेश पांडे यांनी सर्व पालक आणि शिक्षकांना आपल्या मुलांसह या ज्ञानोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

## राष्ट्रसंतांची शैक्षणिक प्रणाली : काळाची गरज

**ज्योतिर्मय साहित्य**

भारतीय संस्कृतीत ज्ञानाला विशेष स्थान आहे. ज्ञान हा जीवनाचा केंद्रबिंदू आहे. ज्ञानाच्या इशाऱ्यानेच जीवनातील सर्व व्यवहार चालतात. ‘वेद’ या शब्दाचा अर्थ ‘ज्ञान’ असा होतो. भगवद्गीतेत स्पष्ट म्हटले आहे ‘‘नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते.’’ यावर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांनी ज्ञानेश्वरीच्या चौथ्या अध्यायात म्हटले आहे ‘‘ज्ञानाचेनि पाडे । पवित्र न दिसे’’ यावरून ज्ञानाहून पवित्र दुसरी कोणतीही गोष्ट नाही, हे स्पष्ट होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आत्मप्रचिती आणि आत्मानुभवासाठी ज्ञानाची उपासना करण्याचा हितबोध समाजाला केला. त्यांनी ज्ञानाचा संबंध व्यवहाराशी जोडला. व्यवहार आणि परमार्थ यांची सांगड ज्ञानाच्या आधारे घातली. ते म्हणतात:

‘‘व्यवहार न कळतो ज्याला, परमार्थ कशाचा त्याला?’’

त्यांच्या मते, प्रथम माहिती मिळवावी, तिची उपासना करावी आणि ती विद्या प्रत्यक्ष जीवनात उतरवावी. पुढे या विद्येच्या आधारे ‘मी-तू’ भेद नाहीसा करून अद्वैताची अनुभूती घ्यावी.

राष्ट्रसंतांनी समाजाला जीवनशिक्षणाचे धडे दिले. ग्रामीण भागापर्यंत ज्ञान पोहोचवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. समाजप्रबोधनासाठी त्यांनी अनेक संस्था उभारल्या आणि संचालित केल्या. श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून त्यांनी रात्रीचे साक्षरता वर्ग विसाव्या शतकाच्या चौथ्या पाचव्या दशकात उघडले होते. आणि त्यानंतर श्री गुरुदेव विद्यामंदिर व आश्रम शाळांची स्थापना केली.

ब्रिटिश काळात शिक्षणपद्धतीत बदल झाले. १८३५ साली थॉमस बॅबिंग्टन मॅकॉले यांच्या अध्यक्षतेखाली इंग्रजी शिक्षणाचा प्रसार करण्याचा निर्णय झाला. लॉर्ड बेटिंगच्या सरकारने बाबूगिरीचे शिक्षण देण्याची प्रणाली या देशात सुरू झाली. या शिक्षणपद्धतीचा उद्देश नोकरदार वर्ग तयार करणे हा होता.



या ‘बाबूगिरी’ शिक्षणपद्धतीवर राष्ट्रसंतांनी टीका केली. ते म्हणतात:

‘‘येथे शिक्षणाची मूळ कल्पना । तीच चुकली आपुली ।।
दिखाऊ कपडे, कोरडी ऐट । नोकरपेशी थाटमाट ।।
हे शिक्षणाचे नव्हे उद्दिष्ट । ध्यानी घ्यावे नीट ।।’’

तसेच या शिक्षण पद्धतीवर टीका करताना ते पुढे म्हणतात:

‘‘व्हावे मोठे बापूसाहेब । काम जुजबी, पैसा खूब ।।
मोठी पदवी, दिखाऊ ढब । ही उच्चता म्हणोची नये ।।’’

राष्ट्रसंतांच्या मते, पदवी आणि नोकरी यांचे नाते जोडले गेले आणि नैतिक मूल्यांना दुय्यम स्थान मिळाले. म्हणून ते स्पष्ट सांगतात:

‘‘नुसते नको उच्च शिक्षण ।
हे तो गेले मागील युगी लपोन ।।’’

त्यांच्या मते खरे शिक्षण तेच, जे मनुष्याला स्वावलंबी बनवते, त्याच्या अंगी गुण, कौशल्ये आणि चारित्र्य विकसित करते.

राष्ट्रसंतांनी संस्कार शिक्षणावर विशेष भर दिला. त्यांच्या मते बालकांवर आई-वडिलांच्या आचार विचारांचा फार मोठा प्रभाव पडत असतो. हे संस्कार मुलं गर्भात असतानाच होत असतात. ते म्हणतात:

‘‘संस्कार दुष्परिणामकारी । न पडावे आतील गर्भावरी ।।
म्हणोनी मात्या-पित्यांनी सदाचारी । राहावे सद्भावे ।।
न करावे अश्लील भाषण । न बघावे दृश्य हीन ।।
न रहावे व्यसनाधीन । दुर्गुणी अन्न न खावे ।।’’

मानवी जीवनात चार प्रकारचे संस्कार असतात प्रारब्ध, मातापित्यांचे, परिस्थितीचे आणि प्रयत्नांचे. या संस्कारांमुळेच मानव उन्नत होत असतो.

बालकांवर चांगले संस्कार व्हावेत म्हणून ते म्हणतात:

‘‘असावे गावीच विद्या भवन । बालोद्यान



डॉ. अपेक्षा नाकतोडे
मराठी विभाग बाबुरावजी घोलप महाविद्यालय सांगवी.
मोबाईल - 7387340467

शिशु संगोपन ।।
मुले बाळपणीच त्यात ठेवून । वळण द्यावे साजेसे ।।’’

राष्ट्रसंतांच्या मते, शहरात शिक्षण घेतलेला विद्यार्थी परत शेतीकडे वळत नाही, त्यामुळे कृषी उद्योगावर वाईट परिणाम होतो. त्यांच्या मते शिक्षणाची विद्यालये ग्रामीण परिसरात आणून जीवन शिक्षणाचे पाठ दिले गेले तरच शिक्षणाचा उपयोग ग्रामविकासासाठी, कृषी उद्योग उन्नत होण्यासाठी होईल. म्हणून ते स्पष्ट सांगतात:

‘‘करावे काय शिक्षण ते ? कधी कामास येईना ।।
पुस्तके पाठ करूनीही, लाभ अंती नसे कोणा ।।’’

शिक्षण हे जीवनाशी जोडलेले असले पाहिजे, अन्यथा ते निरुपयोगी ठरते.

शिक्षकांविषयी राष्ट्रसंतांचे विचार :

राष्ट्रसंतांचा शिक्षकांविषयीचा दृष्टिकोन अत्यंत उच्च आहे. त्यांनी आपल्या भाषणात म्हटले आहे:

‘‘माझ्या प्रिय शिक्षकांनो, जगातील सर्वात श्रेष्ठ कलावंत म्हणून मी तुमच्याकडेच अभिमानाने व आदराने बोट दाखवू शकेन कारण ओबडधोबड पाषाणांना परिश्रमपूर्वक घासून- तासून देवरूपात आणण्याची शक्ती तुमच्यात आहे....... जगाला पाहिजे त्या दिशेला झुकविण्याचे सामर्थ्य तुमच्या फुंकरत आहे! जगातील सर्व शोध व सुधारणांचे जनक तुम्हीच आहात.’’

विद्यार्थ्यांबाबत ते म्हणतात:

‘‘भीतीऐवजी प्रीतीचेच वजन खरे यशस्वी होऊ शकते. भावना उत्पन्न करायची असेल तर ती जड पंडिती नको, विद्यार्थ्यांच्या हृदयात ठसणारी साधी असावी. शिक्षणाचा आरंभ गंभीरतेतून नव्हे तर प्रसन्नतेतून करावा.’’ शिक्षणातून विद्यार्थ्यांचे शील व चारित्र्य साकारता आले पाहिजे.

राष्ट्रसंतांच्या मते शिक्षणात जीवनमूल्यांचा समावेश असावा. जीवन शिक्षणातून श्रमप्रतिष्ठा, स्वच्छता, शिस्त, निर्भयता, सर्वधर्मसमभाव, बंधुभाव, चारित्र्यसंवर्धन, व्यायाम, सौजन्य आणि सहकार्य या दहा जीवन मूल्यांची रुजवणूक होण्याची गरज आहे.ते म्हणतात:

‘‘चारित्र्यवान व्हा सारे । व्हा शूरवीर, गुणी व्हा रे ।।
देशाचे भरवूनी वारे । तरुण हो! कामी लागा रे ।।‘‘

अशा प्रकारे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या शिक्षणविचारांवर आधारित शिक्षणप्रणाली आजच्या काळाची गरज आहे. ही प्रणाली प्रत्यक्षात राबवली, तर समाज सुशिक्षित, संस्कारित आणि समृद्ध होईल, यात शंका नाही.

## विशेष लेख...

### वीस हजारांसाठी भावाने बहिणीचा सांगाडाच नेला बँकेत

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

बँकेच्या क्लिष्ट नियमांनी आणि कर्मचाऱ्यांच्या ताठर भूमिकेमुळे एका हताश भावाला चक्क आपल्या मृत बहिणीचा सांगाडा उकरून बँकेत न्यावा लागल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. ओडिशामधील केओन्झर जिल्ह्यात ही मन हेलावून टाकणारी घटना घडली असून, यामुळे बँक प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. घटना अत्यंत हृदयद्रावक आणि व्यवस्थेच्या संवेदनशून्यतेवर बोट ठेवणारी आहे.

दिलाली गावातील जीतु मुंडा (५०) यांची मोठी बहीण कालरा मुंडा (५६) यांचा दोन महिन्यांपूर्वी आजारपणामुळे मृत्यू झाला होता. कालरा यांनी जनावरे विकून कष्टाने कमावलेले २०,००० रुपये त्यांच्या ओडिशा ग्रामीण बँकेच्या खात्यात जमा होते. जीतु हे त्यांचे एकमेव वारस असल्याने, त्यांनी या पैशांसाठी बँकेत धाव घेतली.

जीतु मुंडा हे अशिक्षित असून त्यांना तांत्रिक कागदपत्रांची माहिती नव्हती. त्यांनी वारंवार बँकेत चकरा मारल्या, पण बँक अधिकारी त्यांना मृत्यू प्रमाणपत्र आणि इतर कायदेशीर कागदपत्रे सादर करण्यास सांगत होते.

जीतु यांच्या दाव्यानुसार, ‘‘मी बँकेत अनेकदा गेलो, पण कर्मचाऱ्यांनी मला सांगितले की ज्यांच्या नावावर पैसे आहेत, त्या खातेदारालाच प्रत्यक्ष घेऊन या. मी त्यांना ओरडून सांगितले की तिचा मृत्यू झाला आहे, पण त्यांनी माझे ऐकले नाही. शेवटी वैतागून मी बहिणीची कबर खोदली आणि पुरावा म्हणून तिचा सांगाडा बँकेत घेऊन पोहोचलो.‘‘

बँकेचा अजब आग्रह आणि बँकेच्या नियमापुढे हतबल झालेल्या भावाने नैराश्यातून मी तिची कबर खोदली आणि तिच्या मृत्यूचा पुरावा म्हणून तिचा सांगाडा बाहेर काढला आणि बँकेत आणला.

बँकेत सांगाडा पाहून कर्मचारी आणि ग्राहकांची मोठी धांदल उडाली. माहिती मिळताच बँकेत पोहोचलेले पाटना पोलीस स्टेशनचे प्रभारी निरीक्षक किरण प्रसाद साहू म्हणाले, जीतु हा एक अशिक्षित आदिवासी माणूस आहे. त्याला कायदेशीर वारस किंवा वारसदार काय असतो हे माहित नाही. मृत व्यक्तीच्या खात्यातून पैसे काढण्याची प्रक्रिया समजावून सांगण्यात बँक अधिकारी अपयशी ठरले आहेत.

त्या माणसाला किती यातना झाल्या असतील जेंव्हा तो माणूस आपल्या बहिणीची कबर खोदत होता .... जेंव्हा बहीण गेली तेंव्हा...मेलेल्या बहिणीचे तोंड पाहूनही त्याला दुःख झाले असेल...शिवाय त्या दिवसानंतर तिला पुन्हा कंकाळच्या स्वरूपात बाहेर काढायचं....किती किती यातना....त्याला आपल्या भावनांना किती बोथट करावं लागलं असेल? विचार करून बुद्धी काम देत नाही . गरिबी किती लाचार आणि गरिबीला लाचार करणारा, कायदा किती वाईट आहे ?

समजा.... तिला दहन केलं असतं तर??? त्याला बँकेला दाखवायला पुरावाच राहिला नसता...म्हणजे त्या गरीब बिचाऱ्या माणसाला बँकेने पैसे दिलेच नसते....

पोलिसांनी बँक अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली आहे. ‘‘जीतु हा एक अशिक्षित आदिवासी माणूस आहे, त्याला कायदेशीर वारसदार प्रक्रियेची माहिती नव्हती. बँक अधिकारी त्याला ही प्रक्रिया समजावून सांगण्यात अपयशी ठरले,‘‘ असे साहू यांनी सांगितले.

पोलिसांनी मध्यस्थी केल्यानंतर तो सांगाडा पुन्हा स्मशानभूमीत सन्मानाने दफन करण्यात आला. पोलिसांनी जीतु मुंडा यांना कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्यांच्या बहिणीचे हक्काचे पैसे मिळवून देण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र, २० हजार रुपयांसाठी एका गरिबाला मृतदेहाची विटंबना करावी लागल्याने सर्वत्र संताप व्यक्त होत आहे.

क्लिष्ट नियम, अटी आणि नोकरशाही मुळे सर्वसामान्य माणसाला छोट्या-छोट्या कामांसाठी मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. ज्यांच्याकडे सत्ता, पैसा किंवा राजकीय वलय आहे, ते अनेकदा कायद्याच्या पळवाटा शोधून मोकाट सुटतात. यामुळे व्यवस्थेवरचा विश्वास कमी होतो. यंत्रणेतील भ्रष्ट प्रवृत्तीमुळे गरिबांना न्याय मिळणे कठीण होते आणि गुन्हेगारांना बळ मिळते.

ही स्थिती लोकशाहीसाठी आणि समाजासाठी नक्कीच घातक आहे. यासाठी व्यवस्थेत पारदर्शकता आणि कायद्याचे समान पालन होणे गरजेचे आहे.




कोणतीही जाहिरात फक्त 100 रुपयात*

ज्योतिर्मय मध्ये जाहिरात द्या आणि आपला व्यवसाय लाखों लोकांपर्यंत पोहोचवा.
दररोज 70000 + सुजाण वाचक. फक्त दर्जेदार साहित्यावर चालणारे महाराष्ट्रातील अग्रगण्य मराठी E दैनिक. नवोदित साहित्यिकांचे हक्काचे व्यासपीठ
सर्वसमावेशक साहित्याचा खजिना गूगलवर पेपर वाचण्यासाठी निशुल्क
कोणीही नवोदित साहित्यिक 500 रु. भरून वर्षभर सहभागी होऊ शकतो.
संपर्क : 7743918559 (for Calling, whatsapp, online payment )
(*नियम लागू )
Paper link : www.jyotirmaysahitya.com



# जात्यावरच्या ओव्या......


ऊन चैत्र वैशाखाच
पिकल्या लिंबोळ्या
पिकले गहू हरभरे
दिसे ओसाड गव्हाळ्या ||६१९||

ऊन चैत्र वैशाखाच
रान आल बहरून
पानावरून कवळ्या
जात ऊन निथरून ||६२०||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग २५

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

संसारात सुख आणि दुःख यांचे चक्र अखंड चालू असते. सुखाचा काळ संपला की दुःख येणारचही अटळ गोष्ट आहे. एखादा माणूस मोठ्या पदावर पोहोचतोआमदार, खासदार किंवा मंत्री होतो. पण त्या सत्तेचा उपयोग लोककल्याणासाठी करण्याऐवजी तो स्वतःच्या स्वार्थासाठी करतो. सत्तेची नशा चढते. परंतु एक दिवस सत्ता जाते, आणि त्याला वास्तवाला सामोरे जावे लागते.

एखाद्या उद्योगपतीचा भरभराटीला आलेला व्यवसाय अचानक तोट्यात जातो. जोपर्यंत सुख आपल्या वाट्याला असते, तोपर्यंत आपण त्यातच रमून जातो. त्या सुखात इतके गुंततो की परमेश्वराची आठवणही होत नाही. आपल्याला वाटतेहे सुख कायम राहील.



परंतु हे सर्व प्रारब्धावर अवलंबून असते. जसे सुख आपल्या कर्मानुसार मिळते, तसेच दुःखही भोगावे लागते. सुख-दुःखाचे हे चक्र, जन्म-मरणाचा हा फ राकोणालाही टाळता येत नाही.

म्हणूनच, जर आपल्याला या चक्रातून मुक्त व्हायचे असेल, तर परमेश्वराशी नाते जोडणे आवश्यक आहे. आणि त्यासाठी जो कोणी आपल्याला सत्य, श्रेयस्कर आणि हितकारक मार्ग दाखवेल, त्याचे बोलणे कंटाळा न करता ऐकणे गरजेचे आहे.

अर्थात, अशी शिकवण संतच देऊ शकतात. समर्थांसारख्या संतांच्या वचनांमध्ये गूढार्थ, अनुभव आणि करुणा दडलेली असते. त्यांचे प्रत्येक शब्द आपल्याला योग्य दिशेने नेणारे असतात.


खरा साधक कधीच त्यांच्या बोलण्याचा कंटाळा करत नाही; उलट तो त्या मार्गावर निष्ठेने चालत राहतो.

स्वसंवाद : माझ्या हितासाठी कोणी सत्य सांगितले तर मी ते खुलेपणाने स्वीकारतो का?

सुखाच्या काळात मी परमेश्वराला विसरतो का, की त्याचे स्मरण ठेवतो?

सुख-दुःख हे क्षणभंगुर आहे याची जाणीव ठेवून मी जीवनाकडे पाहतो का?

संतांचे किंवा हितचिंतकांचे मार्गदर्शन मी मनापासून ऐकतो आणि आचरणात आणतो का? **(क्रमशः)**





# सुविचार - प्रकाश




प्रकाश शिवाजी भोंगाळे
मायणी ता खटाव जि सातारा
मो नं 9271686230

♦सर्व धर्मांचे सार समानच
विश्वातील सर्व मानव एकच
जन्ममृत्यू ही सारखाच
सर्वनाशास कारण धर्मभेदच

♦ईद दिवाळी नाताळ पोंगल
सर्व मिळूनी साजरा करू,
मनामनातून प्रेम वाढवणे
अखंड मानवतेचे स्मरण करू

# त्याग हे यज्ञाचे खरे मर्म आहे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

सदाचरणाने राहणाऱ्या माणसाला खर्च कमी लागतो, कारण खऱ्या समाधानाने पोट भरले की अन्नही कमी लागते. मी हे वारंवार सांगतो, कारण सदाचरणाचे, नीतिधर्माचे आचरण, हा परमार्थाच्या इमारतीचा पायाच आहे. पाया भक्कम नसेल तर त्यावरची इमारत जास्त दिवस टिकू शकणार नाही. त्याप्रमाणे नीती जर सांभाळली नाही, तर पुढच्या कर्माचा फारसा उपयोग होत नाही. परस्त्री मातेसमान माना, परद्रव्याची अभिलाषा बाळगू नका आणि परनिंदेला विष्ठा समजून त्याग करा. या तीन गोष्टींना फार सांभाळा. परमार्थाची इमारत या तीन गोष्टींवर उभी करायची आहे. नुसता पाया बांधून ज्याप्रमाणे घरात राहता येत नाही, त्याप्रमाणे पायाशिवाय इमारतही उभी करता येत नाही. 'राम कर्ता' ही भावना ठेवून नामात राहणे, म्हणजे परमार्थरूपी इमारतीत आनंदात राहणेच होय. व्यावहारिक मोठेपणा बाजूला ठेवा आणि देवाला अनन्यभावाने शरण जा. देवाला शरण जाताना सर्व विसरून जा. समजा, एखादा माणूस नाटकात राजाचे काम करीत असला आणि नाटक संपल्यावरही तो घरी घेऊन जर राजासारखे वागू लागला, तर त्याचा सर्व व्यवहार बिघडून जाईल; त्याचप्रमाणे, देवाला शरण जाताना, मी मोठा भक्त, विद्वान्, पैसेवाला ही सर्व नाती विसरून गेले पाहिजे.

कर्माचे फळ आपल्या हातचे नाही म्हणून त्याची काळजी करू नये, हे समजले तरी, काळजी न करणे हे देखील आपल्या हातचे नाही म्हणून आपण काळजी करतोच ! यासाठीच भगवंताच्या नामात राहण्याची सवय करा. कर्म करणे यात विशेष नाही. आपल्याला कर्म केल्याशिवाय चैनच पडत नाही. 'कर्म करा' असे गीतेतही सांगितले आहेच. परंतु कर्म केल्याने पाहिजे ते फळ आपल्याला मिळतेच असे नाही; म्हणून भगवंताला स्मरून कर्म करा, आणि मग काय काय होते ते पहा. तेच निष्काम कर्म. भगवंताच्या इच्छेने सर्व घडते आहे ही भावना ठेवून आपले कर्तव्य करणे, हे सर्व गीतेचे सार आहे.

जो समजून त्याग करील त्याला फायदा होईल. नाहीतरी, संन्यास आणि त्याग दोन्ही आपल्याजवळसुद्धा आहेत. भगवंताच्या बाबतीत आपण संन्यासी वृत्ती धारण करतो आणि आपण आपल्या आईबापाला सोडतो असा त्याग करतो ! हे काय कामाचे ? त्याग हे यज्ञाचे खरे मर्म आहे. भगवंताच्या प्राप्तीच्या आड जे जे येते ते ते टाकणे, म्हणजे यज्ञ करणे होय. या यज्ञामध्ये वासनांची आहुती द्यावी. कोणत्याच गोष्टीबद्दल हवे अगर नको असे न वाटणे, हेच वासनांची आहुती दिल्याचे लक्षण आहे.

जेथे वासना संपली तेथेच भगवंताची कृपा झाली.

# || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

## ♦चुका♦

मागील अंकावरून......

गुरु द्रोणाचार्य यांनी जेव्हा त्यांचे शिष्य दुर्योधन व युधिष्ठिर यांना सभेमध्ये बसलेल्या पैकी सर्वात दुष्ट माणूस, पापी माणूस हुडकून काढण्याची सांगितले, तेव्हा दुर्योधनाला सभेतील सर्वच लोक पापी आणि दुष्ट दिसले. तर युधिष्ठीराला सभेमधील सर्वच लोक सद्शील, पुण्यवान दिसले. तो स्वतःच एकटा पापी आणि दुष्ट आढळला.

दुसऱ्या मध्ये चुका हुडकणे अतिशय सोपे आहे. स्वतःतील चुका हुडकायला मनाचा निर्मळपणा हवा.

आपल्या मनात इतरां विषयी विरोधी भाव जरी आले, तर त्याच्या मनात आपोआप आपल्याविषयी विरोधी भाव प्रकट होतात. हे एक मोठे चमत्कारिक मानस शास्त्र आहे. पण ते सत्य आहे. याचे उदाहरण असे की. एकदा एक राजा व एक व्यापाऱ्याचा मुलगा एकाच गुरुकुलात शिक्षण घेत होते. तेथील शिक्षण पूर्ण झाल्यावर तो राजकुमार आणि व्यापाऱ्याचा मुलगा परत आपापल्या गावी आले. राजकुमार कालांतराने राजा झाला. तर त्या व्यापाऱ्याचा मुलाचा आता व्यापारी झाला.व्यापार्याच्या मालकीचे एक मोठे चंदनाचे जंगल होते. आणि त्या जंगलातील चंदन विकून याचा व्यवसाय चालत असे. चंदन सारखी महागडी गोष्ट फारशी विकल्या जाई ना.म्हणून त्याचा व्यापार मंदावला. म्हणून तो व्यापारी आता चिंतेत पडला. एकदा त्याचा मित्र जो आता राजा झाला होता त्याची मिरवणूक लवाजम्या सहित या व्यापाऱ्याच्या घरासमोरून चालली होती. राजाचे सारे वैभव त्या मिरवणुकीतून दिसून येत होते.

क्रमशः..........

# प्रभातपुष्प

## षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे (काव्यसंध्या)
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

विषय :- माझे मन

सुंदर,चंचल,हळवे
नितळ,निर्मळ असे
आहे माझे मन
माझ्या सोबत जोडलेल्या
नात्यांच्या या आठवणींचे
जपले अनमोल धन

माझे मन आहे
साधे,सरळ,छान
मदतीस तयार असते
सतत बदल होताना
दुःखात रडते नि
आनंदात छान हसते



# आरोग्य संजीवनी

# लिंबू सरबत चे फायदे

ज्योतिर्मय साहित्य



लिंबू सरबत (लेमन जुस ) उन्हाळ्यात खूप फायदेशीर ठरते. याचे काही महत्त्वाचे फायदे खाली दिले आहेत.

लिंबू सरबताचे फायदे :
शरीर थंड ठेवते

उन्हाळ्यात शरीरातील उष्णता कमी करते आणि ताजेतवाने ठेवते., डिहायड्रेशन टाळते. पाणी, मीठ आणि साखर यामुळे शरीरातील पाण्याची कमतरता भरून काढते. व्हिटॅमिन भरपूर

रोगप्रतिकारक शक्ती वाढवते आणि सर्दी - खोकल्यापासून बचाव करते. पचन सुधारते

जेवणानंतर घेतल्यास अन्न पचायला मदत होते.

त्वचेसाठी चांगले त्वचा स्वच्छ, चमकदार ठेवते आणि टॉक्सिन्स बाहेर काढते.

वजन कमी करण्यात मदत

कोमट पाण्यात लिंबू आणि मध घेतल्यास फॅट कमी होण्यास मदत होते.
थकवा कमी करते

लगेच ऊर्जा देते आणि थकवा दूर करते.

लिंबू सरबताचे आणखी फायदे :

- डिटॉक्स (शरीरशुद्धीकरण) सकाळी कोमट पाण्यात लिंबू घेतल्याने शरीरातील घाण () बाहेर पडायला मदत होते.

- लिव्हरसाठी फायदेशीर लिंबू लिव्हरची कार्यक्षमता सुधारते आणि पित्त स्राव वाढवते.

- ब्लड प्रेशर नियंत्रित ठेवते. लिंबूमध्ये पोटॅशियम असल्यामुळे रक्तदाब संतुलित ठेवण्यास मदत होते.

- तोंडाची दुर्गंधी कमी करते. लिंबू सरबत पिल्याने तोंडातील बॅक्टेरिया कमी होतात.

- किडनी स्टोनचा धोका कमी. लिंबातील सिट्रिक एसिड किडनी स्टोन तयार होण्याची शक्यता कमी करते.

- भूक वाढवते जेवणापूर्वी घेतल्यास भूक सुधारते.

- उष्माघात () टाळते. उन्हात फिरताना लिंबू सरबत घेतल्यास शरीर सुरक्षित राहते.

लिंबू सरबत पिण्याचे योग्य वेळ :

सकाळी रिकाम्या पोटी (कोमट पाण्यात)

उन्हातून आल्यावर व्यायामानंतर जास्त साखर टाकू नका (वजन वाढू शकते)

ॲसिडिटी असेल तर कमी प्रमाणात घ्या रोज १२ ग्लास पुरेसे आहेत.

***

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

# सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

## ♦माता शक्ती वंदन

आज आपल्या भारत देशात 140 कोटी लोकसंख्येत 40/60 कोटी महिला किंवा स्त्रिया आहेत. आणि आजच्या युगात उद्योग तंत्रज्ञान, खेळ ते वैद्यकीय ते विज्ञान, सशस्त्र दलापर्यत, घरापासून ते संगीत, अध्यापन कलाक्षेत्रात
आपली सामाजिक उपयोग सिध्य करतांना दिसत आहेत. ही भारताची एक जमेची बाजू आहे. म्हणून आजच्या तरंग मधे स्त्रीशक्तीला सलाम.
विशेष म्हणजे सध्या महिला आरक्षण/नारी शक्ती वंदन अधिनियम आणि परिसीमन विधेयक 2026 येऊ घातले आहे. यामुळे लोकसभेत व विधान सभेत महिलाना एक तृतीअंश जागा आरक्षित होत
आहे. पुरूष जरी सर्व शक्तीमान असला तरी तो पूर्ण होतो, त्याचा विकास होतो,त्याची प्रगती होते ती नारीच्या सहकार्याने! ती घरीआणि बाहेरही आता सहभागी होत आहे. तिचे कर्म, योगदान, संस्कृती संस्कारात भुमीका व कटिबद्यता यामुळे राजकारण व विधीमंडळात आरक्षण व्हावे,असे खुद्द पंतप्रधान म्हणत आहेत, यातच सर्व आले.जर सर्वत्र स्त्रीचे योगदान आहे तर राजकारण व ईतर ठिकाणी तीला हक्क आहे. म्हणून ती या आरक्षणा मुळे प्रत्येक कामात पुढे जाईल!आज थांबतो, गुड डे व्हेरी गूड़ मार्निंग. ऊद्या पुन्हा भेटू, याच वेळी, याच सदरात, हे सदर चालू ठेवल्याबद्दल ई. दैनिक संपादक ज्योतीर्मय श्री संजय व्यापारी सराचे धन्यवाद.

# सुमन शिरसाट : दीर्घकाळची जिव्हाळ्याची मैत्रीण

ज्योतिर्मय साहित्य

१९९० चा तो काळ साधेपणाचा, संघर्षाचा आणि नात्यांच्या उबदारपणाचा. त्या काळात आमची मैत्री रुजलीमी आणि सुमन शिरसाट, पुढे संगीता गवळी, निर्मला निमोने आणि इतर मैत्रिणींसह आम्ही सगळ्या बालवाडीत रुजू झालो. आज या घटनेला जवळपास ३५ वर्षे पूर्ण होत आहेत. त्या वेळी 'बालवाडी' ही संकल्पना नव्याने रुजत होती; आजच्या 'ज्युनिअर केजी' आणि 'सिनियर केजी'च्या आधीचा तो प्राथमिक टप्पा होता.

त्या काळातील परिस्थिती अत्यंत प्रतिकूल होती. महिन्याचा पगार केवळ ९० रुपये! तरीही कामाबद्दलची निष्ठा आणि मुलांबद्दलचं प्रेम मात्र अफाट होतं. काही वर्षांनी आम्ही अंगणवाडीत गेलो, तेव्हा पगार १५० ते २०० रुपयांपर्यंत वाढला. पण कष्ट मात्र तितकेच राहिले. मी देरडा येथे पायी जाऊन अंगणवाडीचे काम करत असे, तर सुमन गाजगाव येथे कार्यरत होती. पुढे मथुराबाई धुमाळ आणि भागीरथीबाई व्यवहारे यांच्यासारख्या मैत्रिणीही आमच्या समूहात सामील झाल्या.

बैठकीसाठी सिद्धनाथ वाडगावला आम्ही सगळ्या पायी जात असू. पुढे बैठका गंगापूरला व्हायला लागल्या. त्यावेळी जाण्याची व्यवस्थित सोय नव्हती खूप अडीअडचणींचा सामना करावा लागला. त्या वेळी ना डांबरी रस्ते, ना वाहतुकीची साधनंकाट्याकुट्यांनी भरलेले मार्ग, उन्हात तहान, आणि पावसाळ्यात चिखल. तरीही आमच्या पावलांमध्ये उत्साह कमी होत नसे. घरून आणलेली शिदोरी सगळ्यांनी मिळून खाण्याचा आनंद काही वेगळाच होता. साध्या चहाच्या घोटातही एकमेकांच्या सहवासाची गोडी मिसळलेली असायची.

कामाच्या सुरुवातीच्या काळात विविध नमुन्यांमध्ये माहिती भरताना आम्हाला अनेक अडचणी येत असत. त्या वेळी सुमनचे पती श्री. शिरसाट सरांनी आम्हाला मोलाची मदत केली.



घरात लहान मुलं, जबाबदाऱ्या, आणि त्यात ही नोकरीहे सगळं सांभाळताना प्रत्येक दिवस एक संघर्षच होता. पण सुमनने हे सर्व अत्यंत प्रामाणिकपणे आणि सचोटीने पार पाडलं. तिच्यावर घराचा संपूर्ण डोलारा होता, तरीही तिने कधीही जबाबदारीपासून दूर गेली नाही. कुटुंबात अनेक आव्हाने असतात ती पेलायला ती समर्थ आहे.

सुमनचा स्वभाव अतिशय समजूतदार आणि संयमी आहे. तिने कधीही कुणाबद्दल राग धरला नाही. तिचं प्रेमळ, मनमिळावू व्यक्तिमत्त्व सगळ्यांना आपलंसं करून घेतं. आम्ही सगळ्या मैत्रिणी एकमेकींच्या सुखदुःखांच्या साक्षीदार राहिलो. दर महिन्याच्या पंधरा दिवसांनी होणाऱ्या बैठकींना जाताना कितीही अडचणी आल्या, तरी सुमनच्या सहवासात त्या सहज पार पडत. (आमच्या मैत्रिणींपैकी काही जणींचे निधन झालं याची खंत वाटते.)

अंगणवाडीतील लहान मुलांना शिकवताना आमचं काम केवळ नोकरी नव्हतं, तर एक सेवा होती. साने गुरुजींच्या शब्दांत सांगायचं तर''करील मनोरंजन जो मुलांचे, जडेल नाते प्रभूशी तयाचे'',या विचाराचीच प्रचिती आम्हाला आमच्या कामातून येत असे. सुमनने या भावनेनेच आपल्या कार्याला न्याय दिला.

प्रशिक्षणासाठी वैजापूर, धुळे, नाशिक अशा ठिकाणी आम्ही एकत्र गेलो. त्या प्रवासात आमची मैत्री अधिकच दृढ झाली,एक बहिण म्हणून, एक सखी म्हणून. प्रत्येक क्षणी एकमेकांची साथ, समजूत आणि आधार लाभला.

आज प्रिय मैत्रीण सुमन शिरसाट दीर्घ सेवेनंतर निवृत्त होत आहे. तिच्या या प्रवासाकडे पाहताना मन अभिमानाने भरून येतं. संघर्षातून




उभं राहून, निष्ठेने काम करत, असंख्य बालकांच्या आयुष्यात प्रकाश पेरणारी ही माझी मैत्रीण खरोखरच प्रेरणादायी आहे. लहान मुलांच्या निरागस वातावरणात आम्हाला आमच्या नोकरीने खूप आनंद दिला. आज आमचे विद्यार्थी खूप मोठ्या पदांवर आहेत. याचा आनंद वाटतो.

तिच्या पुढील आयुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

आरोग्य, आनंद आणि समाधानाने भरलेलं आयुष्य तिला लाभो,हीच प्रार्थना.

(या कौटुंबिक निवृत्ती समारंभाला अंगणवाडी पर्यवेक्षिका हर्षल जाधव, सुमन शिरसाट, लता गायकवाड, साधना अंकुश, डोणगावकर मॅडम, रेखा हिवाळे, मंगल गवळी, श्री शिरसाट सर, प्राची हिवाळे, रंजना हिवाळे, अनुसया काळवणे, मथुराबाई धुमाळ, भागीरथीबाई व्यवहारे आदींची उपस्थिती होती. हा निवृत्ती समारंभ अंगणवाडी केंद्र, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, गाजगाव या ठिकाणी झाला.)

# योग हा जीवनाचा आधार - योग शिक्षक प्रकाश वानरे

ज्योतिर्मय साहित्य

पुसद (प्रा.रमेश वाघमारे) : पतंजली योगपीठ हरीद्वार, पतंजली योग समिती पुसद अंतर्गत मागिल चार वर्षांपासून नियमित अखंड चालणारा छत्रपती योग वर्ग, पत्रे ले-आउट, पुसद यांच्या वतीने नागरिकांच्या निरोगी, आनंदी व यशस्वी जीवनासाठी तीन दिवसीय निःशुल्क योग शिबिराचे आयोजन दि.२७,२८,२९ एप्रिल या कालावधीत करण्यात आले होते. पतंजली योग समिती पुसदचे प्रमुख व योग प्रचार व प्रसार कार्याला समर्पित शिक्षक दांपत्य योगगुरू प्रकाश वानरे तसेच सौ.माधुरीताई वानरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिरात विविध योगाभ्यास, आसन, प्राणायाम व आरोग्यविषयक, योगोपच्यार यावर मार्गदर्शन व प्रात्यक्षिक करून दारवविले. तिसऱ्या दिवसी २९ एप्रील रोजी झालेल्या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा डॉ केशव चेटूले तर प्रमुख अतिथी प्राचार्य प्रल्हाद वावरे , मोखाडे साहेब तालुका कृषी अधिकारी व प्रमुख मार्गदर्शक योग गुरु प्रकाश वानरे,सौ माधुरीताई वानरे पतंजली योग समिती पुसद प्रभारी, व पतंजली योग समिती जिल्हा यवतमाळ महिला प्रभारी ह्याची होतीया प्रसंगी योगशिक्षक झरकर सरांनी सुरेल आवाजात छ. शिवाजी महाराज यांचा पोवाडा गायला. या व्यासपीठावर



सौ संध्याताई अनिल वीरखडे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त त्यांचा प्राचार्य प्रल्हाद वावरे योग गुरु श्री प्रकाश वानरे सौ माधुरीताई वानरे श्री मोखाडे साहेब यांच्या हस्ते शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला

संपूर्ण पुसद मध्ये विविध ठिकाणी चालणाऱ्या योग वर्गाचे योगशिक्षक तसेच कट्टर कार्यकर्ते यांचा व छत्रपती योग वर्गाचे नियमित योगशिक्षक श्री कैलास भांगे व सौ अनिता भांगे त्याचप्रमाणे प्राचार्य प्रदीप जयस्वाल व सौ स्वाती जयस्वाल यांचाही शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.कट्टर नेहमीच योग साधक म्हणून श्रीमती रत्नमाला शेंडे व श्याम जाधव यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी लेआऊट मधील अमृता सुशांत महल्ले हिने नुकतीच एमबीबीएस पदवी मिळवली त्याबद्दल व कु.रेणू उर्फ अनुष्का सतिश ठोंबरे हिने सीबीएसई १० वी च्या परीक्षेत ९६.१५ टक्के गुण मिळाविले त्या बदल तिचा ही सत्कार प्राचार्य वावरे व इतर मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला या प्रसंगी काही योगसाधकांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या.शिबीरात एकूण ९० स्त्री पुरुषांनी योग शिबीराचा लाभ घेतला.

छत्रपती उद्याना मध्ये झालेल्या या शिबीरात तीन दिवस आवळा, बेल व निंबाचा ज्यूस सर्व योग साधकांना प्रदीप जयस्वाल व नामदेवराव इंगळे यांच्या वतीने देण्यात आला.

समारोपीय कार्यक्रमाचे शेवटी श्री कैलास भांगे ,गजरे साहेब , अमोल उबाळे, मारोतराव सरगर यांच्या वतीने सर्व योगसाधकांना नाश्ता देण्यात आला. प्रास्ताविक कैलास भांगे व सुंदर सुत्रसंचलन ए.के.देशमुख यांनी केले. शिबीर यशस्वी करण्यासाठी निरंतर सक्रीय केशव चेटूले,प्रा ठेंगे साहेब, प्राचार्य जयस्वाल, निळकंठ घाडगे, प्रा प्रल्हाद दवने, सौ.निशाताई चटुले,ए के देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले.



# सागर सोनवणे यांना 'यंग ॲग्री-इन्स्पिरेटर' पुरस्कार

## ताडपिंपळगावच्या सुपुत्राची कृषि क्षेत्रात मोठी झेप

ज्योतिर्मय साहित्य

कन्नड - कृषी क्षेत्रातील नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आणि शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी कार्यरत असलेल्या ताडपिंपळगाव (ता. कन्नड) येथील सक्सेस ॲग्रोचे संस्थापक सागर राजेंद्र सोनवणे यांना प्रतिष्ठित चा राज्यस्तरीय यंग ॲग्री-इन्स्पिरेटर अवॉर्ड २०२५ ( - २०२५) प्रदान करण्यात आला. राज्याचे कृषी मंत्री ना. दत्तात्रय भरणे आणि कृषी आयुक्त सूरज मांढरे यांच्या शुभहस्ते हा सन्मान सोहळा नुकताच पार पडला.

यावेळी सागर सोनवणे यांच्यासोबत त्यांचे सहकारी शुभम सोनवणे आणि भारत जाधव यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

तंत्रज्ञानाची मातीशी नाळ

सागर सोनवणे हे स्वतः बी.एस्सी. ॲग्रिकल्चर पदवीधर असून त्यांनी केवळ पदवी घेऊन नोकरीच्या मागे न लागता सक्सेस ॲग्रोच्या माध्यमातून शेतीमध्ये नॅनो तंत्रज्ञान, आधुनिक फवारणी यंत्रणा आणि सेंद्रिय खतांच्या वापराबाबत मोठा प्रसार केला आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात मोसंबी, अद्रक आणि टोमॅटो पिकात त्यांनी केलेले प्रयोग आज आदर्श मानले जात आहेत. त्यांच्या याच कार्याची दखल राष्ट्रीय स्तरावर कार्य करणाऱ्या टीफान फाउंडेशनने घेतली आहे.

तरुणांसाठी प्रेरणादायी कार्य

पुरस्कार प्रदान करताना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सागर सोनवणे आणि त्यांच्या टीमचे कौतुक केले. ते म्हणाले की, ''सागर सारखे सुशिक्षित तरुण जेव्हा शेतीकडे व्यावसायिक दृष्टीने पाहतात, तेव्हा खऱ्या अर्थाने ग्रामीण महाराष्ट्राचे चित्र बदलते.'' कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनीही सक्सेस ॲग्रोच्या तांत्रिक सल्लागारांचे आणि त्यांच्या प्रगतशील विचारांचे कौतुक केले.

## चारित्र्यशील, धार्मिक और नीतिमान गुण स्वामिनी

# 'मंदोदरी'

लेखिका - डॉ. मीना श्रीवास्तव





आगे.......

साथ ही उसे सुविचार और सन्मार्ग का स्मरण दिलाकर उपदेश दिया कि, वह युद्ध में भाग लेकर अनीति के मार्ग पर न जाए | परन्तु मेघनाद अपनी माता का सुयोग्य उपदेश न मानकर युद्ध में शामिल हुआ और लक्ष्मण के हाथों मृत्यु को प्राप्त हुआ |

जब रावण द्वारा अपमानित होकर विभीषण राम का साथ देने के लिए तत्पर था, तब मंदोदरी ने इस सत्कृत्य में लिए उसे समर्थन ही दिया| हनुमान सीता की खोज में जब रावण के अंतःपुर में गया, तब मंदोदरी का सात्विक सौंदर्य देखकर कुछ क्षण उसके मन में शंका हुई कि कहीं यह देवी सीता तो नहीं?

रावण के सीता पर अत्यधिक मोहित होते देख रूपगर्विता मंदोदरी ने एक दिन उससे कहा, "सीता मेरे जितनी रूपमती निश्चित ही नहीं, परन्तु वह इंद्र की पत्नी शची तथा चंद्र की पत्नी रोहिणी के समान ही पतिव्रता है |"

दुर्भाग्यवश मंदोदरी के सारे प्रयत्न विफल हो गए और उस घनघोर युद्ध में उसके तीनों पुत्र मार दिए गए | अब युद्ध के अंतिम चरण में रावण युद्ध के लिए तैयार हुआ| इस बिकट घडी में अब मंदोदरी अपने पती के पीछे एक वीरपत्नी बनकर खड़ी रही| रावण वध के पश्चात वह पतिव्रता अपने पती के साथ सती जाने के लिए तत्पर थी, परन्तु श्रीराम ने उसे किसी तरह समझाया, साथ ही विभीषण को उस समय प्रचलित प्रथाओं के अनुसार मंदोदरी से विवाह करने की आज्ञा दी | इसलिए मंदोदरी का सती जाना आप ही आप टल गया | यह विवाह केवल राजनैतिक दृष्टिकोण से संपन्न हुआ, ताकि रावण के विश्वसनीय अनुयायी बिभीषण के विरूद्ध विद्रोह न कर सकें| इसीलिये रावण जैसे पराक्रमी परन्तु स्त्री लोलुप राक्षस की पत्नी होते हुए भी अपने सद्गुण तथा पातिव्रत्य के असिधारा व्रत के कारण मंदोदरी हमारी पंचम पंचकन्या के रूप में सदैव प्रातःस्मरणीय बनी रही |

मंदोदरी को उपरोक्त श्लोक में 'कन्या' कहा गया यद्यपि वह पत्नी एवं माता थी| वह स्त्री के परम पवित्र कन्या रूप में ही जानी गई| साथ ही "पति की छाया और बच्चों की जाया" के पारम्परिक छवि से उबरकर उसने अपने स्वतंत्र स्त्रीत्व का नया मापदंड प्रस्थापित किया | मंदोदरी ने स्वयं की पीड़ा से राज्यहित तथा उसकी सुरक्षा को अधिक महत्व दिया और राज्य स्थिर बना रहे इसलिए अपने देवर से विवाह किया! यह आत्मत्याग अतिश्रेष्ठ था| इस पृथ्वी तल पर मंदोदरी अवतीर्ण हुई तब वह नवयौवना थी, परन्तु उस पर इतने सुन्दर संस्कार किसने, कब और कैसे किये, या वे जन्मजात ही थे, यह जानने का कोई मार्ग उपलब्ध नहीं है!

■ ■ ■

# वस्तू वस्तू जपून ठेव...

## ढिंचणीया (8)



कालच्या अंकावरून पुढे.....

♦ पितळी सजावट : लाकडी ढिंचणीयावर पितळी फुले लावून त्याला अधिक आकर्षक बनवलेले असते. हे विशेषतः श्रीमंत किंवा सरंजामी थाटाच्या घरांमध्ये पाहायला मिळत असे.

हे साधारणपणे ४ ते ६ इंच उंचीचे असतात, जेणेकरून बसलेल्या स्थितीत हाताचा कोपर किंवा गुडघा त्यावर टेकवता येईल. त्या मुळे गुडघ्या वरचा ताण कमी होतो. मांडी लॉक व्हायला मदत होते, ज्या मुळे दीर्घकाळ ताठ बसता येत असे. या मुळे रक्ताभिसरण सुरळीत रहाते. आणि सांधेदुखीचा त्रास कमी होतो. काशाचे ढिंचण आरोग्यासाठी चांगले असते. यावर नक्षीकाम, छिद्रे असतात. त्या मुळे हवा खेळती रहाते. आणि घाम येत नाही.

काही लाकडी ढिंचण बुद्धीबळातील प्याद्याच्या आकाराचे असायचे. त्याने शरीराच्या काही भागावर मसाज करण्यासाठी वापर केला जायचा. काहीवर जप करताना कोपर टेकवला जात असे. त्यामुळे हाताला रग लागत नसे.

हे केवळ उपयोगाची वस्तू नसून घराच्या सौंदर्यात भर घालणारे एक शोभेचे साधनही मानले जात असे.

आजच्या काळात या वस्तू केवळ संग्रहालयात किंवा जुन्या घराण्यांच्या वारशात पाहायला मिळतात. पण कोणाच्या घरात असेल तर त्याची काळजी घेऊन शोभेच्या वस्तूंची नक्कीच शोभा वाढवेल.

सफाई आणि निगा राखण्यासाठी काही गोष्टी कराव्यात.

धुळीपासून संरक्षण करण्यासाठी यावर बारीक मणी आणि धागे असल्याने ओल्या कापडाचा वापर टाळावा. मऊ ब्रशने (उदा. पेंट ब्रश) हळुवारपणे धूळ झटकून घ्यावी.

पाण्याचा वापर टाळावा. जर यामध्ये लाकूड किंवा पुठ्ठा असेल, तर पाणी लागल्याने ते फुगू शकते किंवा मणी सुटू शकतात.

धातूची चकाकी टिकवण्यासाठी जर त्यावर चांदीचे किंवा पितळेचे मणी असतील, तर त्यांना हलक्या हाताने कोरड्या सुती कापडाने पुसावे. कोणत्याही प्रकारचे तीव्र केमिकल वापरू नका.

या वस्तूचा वापर केवळ प्रदर्शनासाठी म्हणून करावा. हवेतील ओलाव्यापासून वाचवण्यासाठी काचेच्या कपाटात (शोकेस) ठेवणे सर्वोत्तम ठरेल.

अशाच काही पूर्वी उपयुक्त पण आता काळाच्या ओघात हरवलेल्या व दुर्मिळ वस्तूंची माहिती घेऊ या.

विभावरी कुलकर्णी
8087810197




ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906


# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

ज्योतिर्मय साहित्य

आपल्या महाराष्ट्राला संतांची भूमि म्हणून ओळखले जाते. हिच महाराष्ट्राची भक्कम ओळख आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे आपल्या महाराष्ट्रातील एक महान, थोर व प्रसिद्ध संत होते. तुकडोजी महाराजांचा जन्म ३० एप्रिल १९०९ साली अमरावती येथे झाला. तुकडोजी महाराजांचे मुळ नाव माणिक होते. तुकडोजी महाराजांचे गुरु अकडोजी महाराज होते. त्यांच्या गुरुकडून त्यांनी सर्व धडे शिकले.

तुकडोजी महाराजांनी देशभर फिरून अध्यात्मिक, सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रबोधन केले. बाहेर देशातही जाऊन त्यांनी सर्वांना विश्वबंधुत्वाची शिकवण दिली. बंधुत्व हे एक असे माध्यम आहे ज्याने आपण शत्रुवर मात करू शकतो. तुकडोजी महाराज म्हणतात की, आपला भारत देश खेड्यांचा देश आहे. आणि जोपर्यंत खेड्यांचा विकास होणार नाही तोपर्यंत देशाचा विकास होणार नाही.

समाजातील सर्व स्तरातील लोकांचा उद्धार होणे गरजेचे आहे. तो कसा होईल? याविषयी चिंता होती त्यांना. ग्रामोन्नती व ग्राम कल्याण हा




मनुष्य यशाचा केंद्रबिंदू आहे. म्हणूनच ग्राम कल्याण झाले की, आपोआप समाज सुधारणा होऊन समाजातील सर्व घटकातील, स्तरातील लोकांचे कल्याण होऊन विकास निश्चित आहे.

त्याकाळी भारतातील खेड्यांची दयनीय अवस्था होती. म्हणूनच ग्राम विकासाच्या,, ग्रामोन्नतीच्या विविध प्रकारच्या समस्यांचा मूलभूत स्वरूपाचा त्यांनी खोलवर विचार केला. प्रत्येक समस्यावरील तोडगा व उपाय, निराकरण यावर उपयुक्त अशा उपाय योजना ही त्यांनी सुचविल्या होत्या.

तुकडोजी महाराजांच्या जीवन कार्यातील अत्यंत महत्वाचा टप्पा म्हणजे त्यांच्या जीवनाला पुर्णत्व प्रदान करून देणारे लेखन. तुकडोजी महाराजांनी अंधश्रद्धा निर्मूलन यावर प्रकाश टाकला. देवभोळेपणा, जुन्या




चालीरिती, धर्म अंधश्रद्धा हे सर्व नष्ट व्हावे जेणेकरून माणसाचा ऱ्हास होणार नाही. समाजातील जाचक रुढीना त्यांनी भजन व कीर्तन रूपी खतपाणी देऊन समूळ नष्ट केले.

आपल्या राष्ट्राचे खरे सौन्दर्य हे खेड्यामध्ये आहे. म्हणून जोपर्यंत खेड्यांचा उत्तम विकास साधला जाणार नाही तोपर्यंत राष्ट्राच्या विकासाचे तिळमात्र महत्व नाही. ग्राम हे सुसंस्कृत, नीटनेटके, सुनिश्चित, नियोजित, सुशिक्षित प्रत्येक गोष्टींमध्ये संपन्न व्हावे हिच खरी तळमळ होती. ग्रामोन्नतीचे खरे शस्त्र म्हणजे सर्वधर्मसमभाव. सर्व समुदाय एकत्र येऊन सर्वधर्म समभाव बाळगावा ही तुकडोजी महाराजांची निर्मळ प्रार्थना होती. तुकडोजी महाराज आपल्या खंजिरी भजनातून स्वतःला अभिप्रेत असलेल्या विवेकी विचारसरणीचा प्रचार व प्रसार करून अध्यात्मिक, सामाजिक, राष्ट्रीय प्रबोधन केले.

जोपर्यंत महिलांची पुरेपूर उन्नती होणार नाही तोपर्यंत राष्ट्राची उन्नती होणार नाही. कुटुंबव्यवस्था, समाजव्यवस्था व राष्ट्रव्यवस्था ही सर्व स्त्री उद्धारावर कशी अवलंबून आहेत. हे त्यांनी भजन व कीर्तनातून पटवून सांगितले. केवळ चुलमूल म्हणत स्त्रीला अंधारात न ठेवता तीला पुढे आणून तिचा उद्धार करणे हे खरे राष्ट्रहीत आहे.

# आरती प्रभू-चिंतामणी त्र्यंबक खानोलकर

ज्योतिर्मय साहित्य

मराठी साहित्यात आपल्या वेगळ्या, संवेदनशील आणि गूढ अभिव्यक्तीमुळे ठसा उमटवणारे नाव म्हणजे चिंतामणी त्र्यंबक खानोलकर. काव्यजगतामध्ये त्यांनी ''आरती प्रभू'' या टोपणनावाने केलेली साधना आजही रसिकांच्या मनात दाटून राहिली आहे. त्यांच्या लेखनात निसर्ग, मानवी मन, वेदना, सौंदर्य आणि अस्तित्वाचे प्रश्न यांचे विलक्षण मिश्रण दिसते.



चिंतामणी त्र्यंबक खानोलकर यांचा जन्म ८ मार्च १९३० रोजी झाला. कोकणातील निसर्गरम्य वातावरणात त्यांचे बालपण गेले. समुद्र, पाऊस, वारा, धुके या सगळ्या निसर्गघटकांनी त्यांच्या मनावर खोल छाप पाडली. पुढे हेच अनुभव त्यांच्या कवितांमध्ये आणि साहित्यकृतींमध्ये सजीव झाले.

त्यांचे शिक्षण मर्यादित असले तरी वाचनाची प्रचंड आवड आणि जीवनानुभव यामुळे त्यांची लेखणी अत्यंत समृद्ध झाली. त्यांनी पत्रकारिता, लेखन, नाट्यलेखन अशा विविध क्षेत्रांत काम केले.

**सौ.सुरेखा राजेंद्र शेजवळ**
माजी उपशिक्षिका कन्या शाळा सातारा

त्यांचे आयुष्य मात्र संघर्षमय होते. आर्थिक अडचणी, सामाजिक परिस्थिती, आणि अंतर्मनातील अस्वस्थता यामुळे त्यांना अनेक चढउतारांना सामोरे जावे लागले. पण या संघर्षांनीच त्यांच्या लेखनाला अधिक गहिरेपणा दिला.

चिंतामणी खानोलकर यांनी काव्यलेखनासाठी ''आरती प्रभू'' हे टोपणनाव स्वीकारले. यामागे काही महत्त्वाचे अर्थ दडलेले दिसतात

''आरती'' म्हणजे भक्ती, समर्पण, प्रकाशाचा उत्सव

''प्रभू'' म्हणजे परमेश्वर, अंतिम सत्य

त्यांच्या कवितेत जे भावविश्व आहे ते केवळ वैयक्तिक नसून एक सार्वत्रिक, आध्यात्मिक स्पर्श घेऊन येते. म्हणूनच त्यांनी स्वतःच्या नावाऐवजी एक अलौकिक, निरपेक्ष ओळख निवडली.

हे नाव त्यांच्या काव्याच्या स्वरूपाशी अगदी सुसंगत आहेजिथे व्यक्ती नाही, तर अनुभव बोलतो.

१. काव्यसंग्रह

आरती प्रभू यांच्या कवितांमध्ये अंतर्मुखता, निसर्ग आणि मानवी वेदना यांचा संगम आहे. त्यांच्या कविता साध्या शब्दांत खोल अर्थ सांगतात.

जोगवा''

''दीपमाळ''

''आरती प्रभूंच्या कविता

२. कादंबऱ्या

त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये मानवी नातेसंबंध, संघर्ष आणि अस्तित्वाचे प्रश्न अधोरेखित होतात. पात्रे वास्तवाशी जोडलेली असतात.

अजगर''

''त्रिशंकू''

''काळोख''

''गंधर्व'' **(क्रमशः)**



## राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनात प्रकाश भोंगाळे यांचा सन्मान

ज्योतिर्मय साहित्य

कोल्हापूर - नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य कोल्हापूर जिल्हा व भारतीय सारस्वत मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय लेखणी मराठी साहित्य संमेलन अतिशय उत्साहात कोल्हापूर येथे पार पडले. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक अशोक भोईटे होते व साहित्य संमेलनासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून मराठी चित्रपट सृष्टीतील सिने अभिनेत्री अदिती सारंगधर उपस्थित होत्या. सदर साहित्य संमेलन सुरेश सकटे संस्थापक अध्यक्ष भारतीय सारस्वत मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाले. या साहित्य संमेलनात व्यसनमुक्ती या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. तसेच खुले कविसंमेलन व निमंत्रित कविंचे कवि संमेलन आयोजित करण्यात आले. यावेळी निमंत्रित कवि म्हणून कविता सादर केल्याबद्दल तसेच साहित्य संमेलनातील उत्कृष्ट सहभागासाठी प्रकाश भोंगाळे यांना आदिती सारंगधर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

# संतवाणी वर मुक्त चिंतन...

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

सहज एक कथा आठवली..कीर्तनकार आणि साध्या स्त्रीची कथा. एक कीर्तनकार दररोज नदीच्या पलीकडे जाऊन कीर्तन करायचे.

एकदा त्यांनी कीर्तनात सांगितले ''जो कोणी पूर्ण विश्वासाने देवाचं नाम घेतो, त्याला संसारसागर तर काय, ही छोटी नदीही अडवू शकत नाही.'' हे ऐकून एक साधी, निरक्षर स्त्री मनापासून भावली.

तिने ठरवलं ''मी नामावर पूर्ण विश्वास ठेवते.''

दुसऱ्या दिवशी काय झालं? ती स्त्री नदीकिनारी आली.

नाव नव्हती तिने डोळे मिटले, देवाचं नाम घेतलं आणि पाण्यावर पाऊल ठेवलं आणि ती हळूहळू चालत नदी पार करून गेली!

तिच्या मनात किंचितही शंका नव्हती.

कीर्तनकाराला आश्चर्य, हे पाहून कीर्तनकार थक्क झाले. त्यांनीही प्रयत्न करायचं ठरवलं ते पाण्यावर उतरले, पण मनात विचार सुरू ''खरंच होईल का? बुडालो तर?'' आणि ते लगेच बुडू लागले!

या कथेचा गूढ अर्थ

१. शब्दांपेक्षा भाव महत्त्वाचा. कीर्तनकार सांगत होते, पण त्यांच्या आत पूर्ण अनुभव नव्हता,

स्त्रीने मात्र पूर्ण मनाने स्वीकारलं

२. शंका = अडथळा जिथे शंका आली, तिथे शक्ती कमी झाली

३. निरागस श्रद्धा = चमत्कार त्या स्त्रीकडे ज्ञान नव्हतं, पण

निर्व्याज, निरागस विश्वास होता

१. संत नामदेव यांची बालनिष्ठा

लहानपणी नामदेवांना विठ्ठलावर इतकी निष्ठा होती की ते देवाला जिवंत मित्र मानायचे।

**संतवाणी वर चिंतन**
**अभावातून प्रभावाकडे...**
सौ अपर्णा परांजपे,
पुणे, मो. 95030 45495

एकदा त्यांनी देवाला नैवेद्य ठेवला आणि म्हणाले

''विठ्ठला, तू खाल्ल्याशिवाय मी जाणार नाही!''

बराच वेळ गेला काहीच घडलं नाही.

पण नामदेव हटले, रडू लागले, आग्रह करू लागले।

शेवटी विठ्ठल प्रकट झाले आणि नैवेद्य खाल्ला!

निरागस, हट्टी निष्ठा असेल, तर परमात्मा प्रत्यक्ष प्रतिसाद देत.

२. संत एकनाथ यांची सहनशील निष्ठा

एकनाथ महाराज गंगाजल आणत होते।

रस्त्यात एक माणूस वारंवार त्यांच्यावर थुंकत होता। पण एकनाथ महाराज शांत, प्रत्येक वेळी परत जाऊन स्नान करून यायचे हे १०० वेळा झालं! शेवटी तो माणूस थकला आणि त्यांच्या चरणी पडला।

निष्ठा म्हणजे फक्त भक्ती नाही,

सहनशीलता आणि स्थिरता देखील आहे

३. संत तुकाराम यांची नामनिष्ठा

तुकाराम महाराज सतत ''विठ्ठल-विठ्ठल'' नाम घेत असत। लोकांनी त्यांची परीक्षा घेतली

त्यांची अभंगांची पोथी नदीत फेकून दिली।

तुकाराम महाराज दुःखी झाले, पण निष्ठा सोडली नाही। ते फक्त नामस्मरण करत राहिले

काही दिवसांनी, ती पोथी नदीवर तरंगत परत आली!

अर्थ : जिथे निष्ठा आहे, तिथे परमात्मा स्वतः रक्षण करतो

४. संत जनाबाई यांची सेवाभाव निष्ठा

जनाबाई दासी होत्या, पण मनाने पूर्ण विठ्ठलमय।

त्या घरकाम करताना सतत नाम घेत असत, आणि म्हणायच्या ''विठ्ठल माझ्यासोबत काम करतो''

असं म्हणतात विठ्ठल स्वतः येऊन त्यांना कामात मदत करत असे!

निष्ठा असेल तर साधं कामही पूजा बनतं.

या सर्व कथांचा एकच सार निष्ठा वेगवेगळ्या रूपात दिसते नामस्मरण (तुकाराम), प्रेम (नामदेव), सहनशीलता(एकनाथ), सेवा(जनाबाई)

पण तत्त्व एकच आहे ''पूर्ण मनाने, शंकेशिवाय, सतत जोडलेलं राहणं''

भगवंत हृदयस्थ आहे

कृतज्ञ मी कृतार्थ मी

# ''समर्पण'' हा अरंगेत्रम सोहळा नृत्य, साधना आणि संस्कृतीचा सुंदर संगम

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

त्यानंतर कल्याण राम रघु राम मृण्मयी मेहेंदळे, पूर्वा मेहता, अनुजा बोकील, प्रिया निकम-भुतकर या चौघींनी नृत्य सादर करून हि रचना सादर केली. ''कल्याण राम रघु राम'' ही ओट्टूकाडु वेंकटसुब्बय्यार यांची भक्तिपूर्ण रचना आहे. हंसनादम् राग आणि आदि ताल यामुळे या कृतिला प्रसन्न, उजळ आणि मंगल रंग प्राप्त होतो. रघुराम म्हणजे श्रीराम यांच्या कल्याणकारी, करुणामय आणि धर्मरक्षक स्वरूपाचे येथे वर्णन आढळते. संस्कृत साहित्यातील ही रचना भक्ती, सौंदर्य आणि लयबद्धता यांचा उत्तम संगम साधते. भरतनाट्यम किंवा कर्नाटकी गायनात ही कृति भावपूर्ण वातावरण निर्माण करते. ओट्टूकाडुंच्या अनेक रचनांप्रमाणेच यातही शब्द, संगीत आणि भक्तिभाव यांचे सुसंगत बांधकाम दिसते.

कार्यक्रमाचा कळस गाठणारा तिल्लाना ही कर्नाटकी संगीताची अतिशय लयप्रधान आणि चैतन्यमय रचना आहे. लल्गुडी जयरामन यांची मांड रागातील आणि आदि तालातील तिल्लाना नृत्यासाठी विशेष प्रिय मानली जाते. तिल्लानामध्ये जती, स्वर, ताल आणि सूक्ष्म नादवैभव यांचा विलक्षण संगम असतो. मांड रागामुळे या रचनेला राजस्थानी-लोकछटा, मृदुता आणि रंगतदार सौंदर्य लाभते. तमिळ साहित्यातील अशा तिल्लानांमध्ये शुद्ध लयबद्धता आणि नृत्याला अनुरूप वेग





आढळतो. अंतिम टप्प्यात सादर होणाऱ्या या रचनेने कार्यक्रमाचा उत्कर्षबिंदू गाठला.

पुरंदरदास रचित कन्नड भाषेतील अभंग मृण्मयी मेहेंदळे, पूर्वा मेहता, अनुजा बोकील, प्रिया निकम-भुतकर या चौघींनी भक्ती रसात समरस होऊन सादर केला. पुरंदरदासांचे अभंग किंवा भक्तिगीते कर्नाटक भक्तीपरंपरेचा मूलाधार मानले जातात. हा अभंग कर्नाटक संगीत पद्धती प्रमाणे मिश्र ललित रागात आणि आदि तालात निबद्ध आहे. कन्नड साहित्यातील पुरंदरदासांची रचना साध्या भाषेत मोठा अध्यात्मार्थ व्यक्त करते. त्यांच्या अभंगांत नामस्मरण, वैराग्य, ईश्वरभक्ती आणि नैतिक जीवनाचा संदेश वारंवार दिसतो. भजनी ठेका असल्याने ही रचना कीर्तन, समूहगायन किंवा भक्तिनृत्यात सहज गुंफली जाते. भक्तिरसाचा थेट, हृदयाशी भिडणारा अनुभव या अभंगातून मिळाला .

प्रत्येक सादरीकरणात अंगभूत लयबद्धता, शास्त्रीयता, भावाभिनय आणि तांत्रिक अचूकता यांचा सुरेख संगम अनुभवायला मिळाला.

विशेषतः अर्धनारीश्वर श्लोकातील तात्त्विक गूढता, नायिका रचनेतील भावनिक सूक्ष्मता आणि तिल्लानातील वेगवान लयवैविध्य यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. ''नाही मी चोरिले लोणी'' या पदातून बालकृष्णाची निरागसता आणि विनोदी छटा जिवंत झाली, तर अभंगातून भक्तिरसाचा ओघ अनुभवायला मिळाला.

या संपूर्ण कार्यक्रमामागील ''समर्पण'' ही संकल्पना अत्यंत प्रभावी ठरली. 'अरंगेत्रम' हा तमिळ शब्द असून त्याचा अर्थ 'रंगमंचावर प्रथम पदार्पण' असा होतो. अनेक वर्षांच्या कठोर साधना, शिस्त आणि गुरुंच्या मार्गदर्शनानंतर नर्तकाचे हे पहिले स्वतंत्र सादरीकरण असते. हा केवळ नृत्यप्रयोग नसून, तो एक पवित्र 'दीक्षासोहळा' आहे. या माध्यमातून कलाकार ईश्वर, गुरु आणि समाजाला आपली कला अर्पण करतो. शास्त्रीय कला ही भाषा, धर्म आणि भौगोलिक सीमा ओलांडणारी वैश्विक अभिव्यक्ती आहे, याचा प्रत्यय या कार्यक्रमातून स्पष्टपणे आला. या यशस्वी सादरीकरणामागे गुरु सौ. वैशाली पारसनीस यांचे योगदान अत्यंत मोलाचे आणि ठळक आहे. त्यांनी केवळ नृत्याचे प्रशिक्षण दिले नाही, तर विद्यार्थिनींमध्ये शिस्त, समर्पण, कलाभान आणि आत्मविश्वास रुजवला आहे. १९९१ साली त्यांनी 'नृत्यांजली' या संस्थेची स्थापना करून साताऱ्यात शास्त्रीय नृत्याची भक्कम परंपरा निर्माण केली. मुंबई विद्यापीठाच्या नालंदा नृत्य कला महाविद्यालयातून ... (नृत्य) आणि पुणे विद्यापीठातून .. (नृत्य) पदवी प्रथम श्रेणीत प्राप्त केलेल्या सौ. पारसनीस यांनी आपल्या कार्याचा विस्तार सातारा, पुणे (वारजे, कोंढवा() तसेच इतर ठिकाणी केला आहे.

महाराष्ट्र शासन सांस्कृतिक संचानालय प्रमाणित नृत्यांजली ही सातारा जिल्ह्यातील एकमेव नृत्य संस्था आहे.




त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थिनींनी गांधर्व महाविद्यालय आणि भारती विद्यापीठाच्या परीक्षांत यश संपादन केले आहे. काहींनी या कलेला करिअर म्हणूनही स्वीकारले आहे. त्या सध्या भारती विद्यापीठात नृत्यगुरू म्हणून कार्यरत असून विविध विद्यापीठांच्या परीक्षक म्हणूनही योगदान देत आहेत. देशभरातील विविध सांस्कृतिक महोत्सवांमध्ये त्यांनी आपल्या नृत्यकौशल्याची छाप उमटवली आहे. 'ऋतुचक्र', 'संतवाणी', 'विघ्न विनायक', 'श्री गणेश' आणि 'तमसो मा ज्योतिर्गमय' यांसारखे प्रयोग त्यांच्या कलात्मक दृष्टीकोनाचे द्योतक आहेत.

नुकतेच महाराष्ट्र शासन सांस्कृतिक विभाग प्रस्तुत , युवा सुराज्य प्रतिष्ठान आणि शास्त्रीय नृत्य संवर्धन संस्था आयोजित पंडिता. रोहिणी भाटे नृत्य महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी नृत्यांजली नृत्य संस्थेच्या पुणे शाखेच्या विद्यार्थिनींनी अतिशय सुंदर आणि प्रभाव पाडणारे आनंद भैरवी रागातील तिल्लानाचे सादरीकरण केले. या महोत्सवाची मूळ संकल्पना श्री. अजय धोंगडे यांची तर मुख्य आयोजक मा.ना. चंद्रकांतदादा पाटील आहेत. पुणे शहराचे महामंत्री श्री पुनीत जोशी यांच्या अथक परिश्रमातून महोत्सवाचे नुकतेच चौथ्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. गेली चारही वर्षे नृत्यांजलीच्या विद्यार्थिनी गुरू. वैशाली पारसनीस यांच्या मार्गदर्शनाखाली पुण्यात या भव्य महोत्सवात आपला वेगळा ठसा उमटवत आहेत. कविता थोलपाडी, विभावरी गोडबोले, राधिका राघवेंद्र, सिद्धिप्रिया गिरमे, राजलक्ष्मी गोखले, मृण्मयी नाईक, चेहेक कांबळे, अनन्या काकडे, अपर्णा.बी, अनुष्का दिघेकर, पूनम शिंगारे , रिया बोरोले या विद्यार्थिनींनी सादरीकरण केले.

अरंगेत्रम् सादरकर्त्या नृत्यांगनांनीही आपल्या अभ्यास, चिकाटी आणि समर्पणाचे उत्कृष्ट दर्शन घडवले. अनुजा बोकील, मृण्मयी मेहेंदळे, प्रिया निकम भुतकर आणि पूर्वा मेहता या सर्वांनी अनेक वर्षांच्या सातत्यपूर्ण प्रशिक्षणातून हे यश संपादन केले आहे. शैक्षणिक आणि वैयक्तिक आयुष्यात विविध क्षेत्रांत प्रगती करत असतानाही त्यांनी नृत्यसाधनेत सातत्य राखले, हे विशेष उल्लेखनीय आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सहकलाकारांचेही मोलाचे योगदान लाभले. नट्टूवांगम आणि नृत्यदिग्दर्शनाची जबाबदारी गुरु सौ. वैशाली पारसनीस यांनीच समर्थपणे सांभाळली. गायन एन. एन. शिवप्रसाद, मृदंगम पंचम उपाध्याया, व्हायोलिन डॉ. नारायण रमण आणि बासरी संजय शशीधरण यांनी सुरेल साथ दिली. सूत्रसंचालन अनुपमा कुलकर्णी यांनी प्रभावीपणे केले. तांत्रिक बाजूही तितकीच भक्कम होती. प्रकाशयोजना हर्षवर्धन पाठक, ध्वनी व्यवस्था सचिन शेवडे, मेकअप लक्ष्मी के. मोहन व श्री.के. मोहन, वेशभूषा सौ. शेवटे, व्हिडिओग्राफी शुभम कुलकर्णी, स्टील फोटोग्राफी 'कॅन्डीड कथा', कार्ड डिझाईन विजय साळुंखे आणि छपाई आशिष दिवेकर यांनी उत्कृष्टरीत्या सांभाळली. एकूणच, ''समर्पण'' हा अरंगेत्रम सोहळा नृत्य, साधना आणि संस्कृतीचा सुंदर संगम ठरला. गुरु सौ. वैशाली पारसनीस यांच्या अथक परिश्रमातून आणि त्यांच्या शिष्यांच्या निष्ठेतून साकारलेला हा कार्यक्रम साताऱ्याच्या सांस्कृतिक क्षेत्रात एक प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठसा उमटवणारा ठरला.

***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559